# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०




# सुस्वागतम

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

- मालेगाव महानगरपालिकेची स्थापना दिनांक 17 डिसेंबर 2001 रोजी झालेली असून मनपाचे एकूण क्षेत्रफळ 63.18 चौ.कि.मी.आहे.
- सन 2011 चे जनगणनेनुसार मालेगाव महानगरपालिकेची लोकसंख्या 5,90,998 आहे.
- मालेगाव शहरात जवळपास 70% टक्के भाग हा झोपडपट्टीने व्यापला आहे.
- शहरात तानाबाना संस्कृती आढळून येते.
- विणकरांचे शहर म्हणून मालेगाव शहराची ओळख आहे.
- मालेगाव महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकूण चार प्रभाग कार्यालय आहेत.
- महानगरपालिका क्षेत्रात एकूण 80 शाळा आहेत.
- शहरात म नपा चे 03 रुग्णालये,05 दवाखाने,14 नागरी आरोग्य केंद्र, 14 उपकेंद्र व 07 आपला दवाखाना आहेत.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे 100 दिवस आराखडा अंतर्गत जाहीर केलेले सप्तसूत्री बाबत माहिती खालील प्रमाणे आहे.

1) **<u>संकेतस्थळ</u>**

- मालेगाव महानगरपालिकेच्या संकेतस्थळ अद्ययावत करण्यात आले असून, त्यामध्ये नागरिकांना लोक सेवा हक्क आयोग,माहितीचा अधिकार,महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 60 अ अन्वये विनिर्द्रिष्ट माहिती,नागरिकांची सनद, तक्रार, ई-सर्विसेस,नोडल अधिकारी, ई निविदा इत्यादी बाबतचे स्वतंत्र टॅब देण्यात आलेले आहे.

- संकेतस्थळावर लोकसेवा हक्क आयोग अधिनियम 2015 व लोकसेवा हक्क नियम 2016 तसेच माहितीचा अधिकार नियम 2005 या कायद्याची माहिती पी.डी.एफ. स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

- मनपाच्या संकेतस्थळावर माहितीचा अधिकार 2005 चे कलम 4 अन्वये विभागनिहाय स्वयंप्रकाशित कारायावयाची माहिती (17 मुद्यांची माहिती) सामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

- मनपाचे संकेतस्थळा वर लोकसेवा हक्क आयोग 2015 अंतर्गत मालेगाव महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सर्व 73 सेवांचे ऑनलाईन पद्धतीने देणेची व्यवस्था नागरिकांसाठी केली आहे.
- मनपाचे संकेतस्थळ सुरक्षित ठेवण्यासाठी सोफोस फायरवॉल कार्यान्वित केलेली आहे.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

**2) सुकर जीवनमान-**

- नागरिकांना जन्म व मृत्यू दाखले सहजतेने उपलब्ध करून देणे कामी मुख्यालयात तसेच चारही प्रभाग कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित आहे.याद्वारे नागरिकांना प्रमाणपत्र कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यात येते.

- नागरिकांसाठी विवाह नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्या साठी संगणीकृत प्रणाली पद्धतीने नोंदणी करण्याची कार्यवाही सुरु आहे,यात नागरिकांना विवाह नोंदणी झाल्यानंतर त्वरित विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

**3) स्वच्छता –**

- मनपा मुख्यालयातील सर्व विभागाचा अभिलेखा हा संगणकीकृत करणेसाठी मनपाने मक्तेदार नियुक्त केला असून याद्वारे सर्व अभिलेखांचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक संकीर्ण - 2018/प्रक्र9/18(र-व-का),दिनांक 15/02/2018 नुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सर्व अभिलेख हा सुरक्षितरित्या जतन केला जात आहे.

- कार्यालयान मधील जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विहित कार्य पद्धतीत विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केलेली आहे.
- जुन्या वाहनाचे निर्लेखन करणेकामी उप-प्रादेशिक परिवहन विभाग, मालेगाव यांचेशी पत्र व्यवहार केला असून लवकर प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## 4) तक्रार निवारण –

- आपले सरकार पोर्टल वर मालेगाव महानगरपालिकेशी संबंधित दि.01/04/2025 पावेतो प्राप्त तक्रारी निर्गमित करण्याची टक्केवारी 99% असून, पीजी पोर्टल वर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचेनिर्गमित करण्याची टक्केवारी 97% आहे.
- मनपाचे सर्व अधिकाऱ्यांच्या दालना बाहेर अभ्यागतांसाठी राखीव वेळे बाबत दर्शनी भागात फलक लावण्यात आलेले आहे.
- लोकशाही दिनात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तात्काळ दखल घेण्यात येवून सत्वर तक्रार निवारण करण्यात येते.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

**5) कार्यालयीन सोयी व सुविधा –**

- मालेगाव महानगरपालिकेच्या मुख्यालयातील प्रत्येक मजल्यावर तसेच चार हि प्रभाग कार्यालयात शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच महिला व पुरुषांसाठी शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे.
- मनपाचे सर्व कार्यालयामध्ये वातावरण प्रसन्न राहील याकरिता कार्यालयांचे सौंदर्यीकरण करण्यात आलेले आहे. कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांसाठी बैठक व्यवस्था केलेली आहे.
- मुख्यालयातील कार्यालयांचे नागरिकांना माहिती व्हावी याकरिता मुख्यालयात दिशादर्शक व नामफलक लावण्यात आलेले आहेत.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## 6) कामकाजातील सुधारणा –

- कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांना ई ऑफिस प्रणाली दैनंदिन कामकाजात वापर करणे कामी राष्ट्रीय सूचना केंद्र,नाशिक (NIC) यांना प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर कामी पाठपुरावा करण्यात येत असून लवकरच प्रशिक्षण आयोजित करून ई ऑफिस प्रणाली मालेगाव महानगरपालिकेत लागू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## 7) अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण,सेवा विशेष बाबी आणि कुत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञाचा वापर (AI) –

- नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते.
- दि.31/03/2024 पावेतो सर्व अधिकारी कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात आलेले आहे.
- सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे कामी कार्यवाही अंतिम टप्यात आहे.
- विभागीय चौकशी कामी स्वतंत्र चौकशी अधिकारी यांची नियुक्ती केली असून यांचा तात्काळ निपटारा करण्यात येतो.तसेच न्यायालयीन प्रकरणे देखील सत्वर निपटारा केली जाते.
- कार्यायातील कामकाज अचूक होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञाचा वापर करण्या साठी सर्व अधिकारी कर्मचारी यांना तज्ञा द्वारे प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## 8) आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन -

- मालेगाव महानगरपालिकेच्या औद्योगिक बांधकाम परवानगी व नळ जोडणी ऑनलाईन पद्धतीने देण्याची व्यवस्था केलेली असून महानगरपालिकेशी संबंधित इतर परवाने देणे बाबत एक खिडकी योजना कक्ष सुरु करण्यात आलेला आहे त्या द्वारे उद्योजकांना कमी कालावधीत सुविधा देणेचा प्रयत्न आहे.

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## 9) नाविन्यपूर्ण उपक्रम -1 सुकर जीवनमान –

- मालेगाव महानगरपालिकेकडून शहरातील नागरिकांना रात्रीच्या वेळी पथदीप व्यवस्था दर्जा उंचावण्यासाठी जुने सोडियम दिवे बदलून त्या जागी उच्च प्रकाशमान व तुलनेत कामी वीज खपत करणारे एल.ई.डी. पाठ दिवे बसविण्याचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| जुन्या पथदिपचा वॅट | बदलण्यात आलेले एल.ई.डी. वॅट | बदलण्यात आलेले नग संख्या | एकूण प्रस्तावित बदल संख्या |
|---|---|---|---|
| 150 वॅट | 70 वॅट | 1569 | 3761 |
| 250 वॅट | 120 वॅट | 267 | 493 |
| 250 वॅट हायमास्ट | 100 वॅट फ्लड | 58 | 110 |
| 400 वॅट हायमास्ट | 200 वॅट फ्लड | 22 | 30 |

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## 10) नाविन्य पूर्ण उपक्रम -2 कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

- मनपाच्या आरोग्य विभागाकडील क्षय रोग निर्मुलन विभागाने क्षय रोगाचे निर्मुलन करण्यासाठी नियोजन पूर्वक कामकाज केले त्यात प्रामुख्याने जनजागृती, लसीकरण, निक्षय कीट वाटप, औषध उपचार करण्यासाठी रुग्णाचा पाठपुरावा इत्यादी द्वारे प्रशंसनीय काम करून संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.
- मालेगाव महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त (प्रशासन) व आस्थापना विभाग या कार्यालयांचे सौदर्यीकरण करण्यात आलेले असून प्रत्येक लिपिकास बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. या द्वारे संबंधित लिपिकाचे कामकाजाचे व्यवस्थापन होणेस मदत झालेली असून कार्यालयीन वातावरण आल्हाददायक करण्यात आलेले आहे.


# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.



राष्ट्रीय क्षय रोग निर्मुलन कार्यक्रमात राज्यात सर्व प्रथम



निक्षय कीट वाटप



अल हज हरून अन्सारी रुग्णालय अग्निशमन प्रात्यक्षिक



अभिलेखा स्कॅनिंग करताना

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## आयुक्त तथा प्रशासक यांचे क्षेत्रीय भेट –



तळवाडे धरण भेट



बचत गट उद्योजक महोत्सव २०२५



नगरोत्थान अभियान अंतर्गत रस्ते बांधणी कामास भेट



अभिलेखा स्कॅनिंग करताना

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## इतर वरिष्ठ अधिकारी यांची क्षेत्रीय कार्यालय भेट-










अभ्यागतांसाठी भेटीची वेळ दर्शविणारा फलक





प्रसाधन गृह दुरुस्ती

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## कार्यालय व परिसराचे सौंदर्यीकरण –







# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## कार्यालय व परिसराचे सौंदर्यीकरण -










# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

## कार्यालय व परिसराचे सौंदर्यीकरण –






## मनपा मुख्यालय इमारत परिसर सौंदर्यीकरण






# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.




(रविंद्र जाधव)
आयुक्त तथा प्रशासक
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.